# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०९/२०२४ (गुरूवार) सकाळ**

---

## हुक्का ओढणाऱ्या इसमांवर धाड कळमेश्वर पोलीसांची कारवाई

दि. १७/०९/२०२४ रोजी पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, सेलु टोल नाक्याजवळील नॅशनल हायवे ॲथोरिटी ऑफ इंडीया चे ॲडमीन बिल्डींगचे मागचे बाजूला काही लोक गोलाकार बसुन हुक्का पीत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ यांनी सेलु टोल नाक्याजवळील नॅशनल हायवे ॲथोरिटी ऑफ इंडीया चे ॲडमीन बिल्डींगचे मागचे बाजूला रेड कारवाई केली असता **आरोपी नामे— १) दिपक लोचन सिंग, वय २६ वर्ष रा. सांनई, २) आशिष सिताराम शर्मा वय २४ वर्ष रा. किशोरपुरा, ३) रविकुमार रामु पासवान वय २८ वर्ष रा. बिलैया, ४) आदीत्यसिंग नरहरिसिंग तोमर, वय २७ वर्ष** हे गोलाकार बसुन मध्यभागी हुक्का पिण्याचे पॉट ठेवुन पाईपचे मदतीने हुक्का पिताना मिळुन आले. एकुण ०४ इसम यांना ताब्यात घेवुन आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे कळमेश्वर येथे कलम ४ सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादने (जाहिरात प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन पुरवठा व वितरण यांचे विनियम) अधिनियम २००३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोनि मनोज काळबांडे, पोउपनि मनोज टिपले, पोहवा अतुल शेंडे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर